दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

**वर्ष : ०४**, अंक : २२१
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, रविवार, दि.२३ मार्च २०२५




# महाराष्ट्राचा गृहविभाग घाशीराम कोतवाल चालवत आहे का?

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२२, पुणे :** गेल्या काही दिवसांपासून औरंगजेबाच्या कबरीवरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. औरंगजेबाची कबर पाडण्याच्या संदर्भात काही संघटनांनी मागणी केली होती. यातच काही दिवसांपूर्वी नागपुरात दंगलीची घटना घडली. तसेच बीड जिल्ह्यातील संतोष देशमुख हत्या प्रकरणही अद्याप चर्चेत आहे. या सर्व घटनांच्या पार्श्वभूम ीरून आता काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर जोरदार टीका केली आहे.

'महाराष्ट्राचा गृहविभाग घाशीराम कोतवाल चालवत आहे का?', असा सवाल हर्षवर्धन सपकाळ यांनी आज पत्रकार परिषदेत बोलताना केला आहे. तसेच राज्यातील कायदा व सुव्यवस्था राखण्यास महाराष्ट्राच्या गृहविभागाला अपयश आलं असून आता महाराष्ट्राला पूर्णवेळ गृहमंत्री मिळायला हवे, अशी मोठी मागणी देखील हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.

**हर्षवर्धन सपकाळ काय म्हणाले?**

महाराष्ट्राला आज पूर्णवेळ गृहमंत्री नाहीत. महाराष्ट्राला पूर्णवेळ गृहमंत्री असले पाहिजेत. काही दिवसांपूर्वी बीड जिल्ह्यात संतोष देशमुख यांच्या हत्येचं प्रकरण घडलं, याबरोबरच म हाराष्ट्रातील अनेक भागात वेगवेगळ्या घटना घडल्या आहेत.

महाराष्ट्रात घडणाऱ्या घटना पाहता आम्ही गृहमंत्र्यांना राजीनामा मागितला आहे आणि आताही मागत आहोत. आता पुन्हा एकदा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना आमचा एक नव्याने प्रश्न आहे. त्या प्रश्नाचं उत्तर देवेंद्र फडणवीस यांनी दिलं पाहिजे. महाराष्ट्राचा गृहविभाग घाशिराम कोतवाल चालवत आहे का? असा प्रश्न सध्या महाराष्ट्रातील परिस्थिती पाहून उपस्थित होत आहे. सध्या म हाराष्ट्रात घाशिराम कोतवाली कारभार गृहविभागाचा सुरु आहे, अशी टीका हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.



**'देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका केली कारण'**


मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा कारभार औरंगजेबासारखाच आहे, असं मी म्हटलं होतं. याचं कारण म्हणजे ते करत असलेला कारभार आहे. आगामी काळात सद्भावना बाळगूनच समाजासाठी काम करण्याची माझी पक्षीय आणि व्यक्तिगत इच्छा आहे. औरंगजेबाचा दाखला देत मी मुख्यमंत्र्यांवर टीका केलेली नसून ते वक्तव्य कारभाराच्या अनुषंगाने होतं. ज्या घटना सध्या राज्यात घडत आहेत त्यामागचं वास्तव अत्यंत क्रूरपणे एकापाठोपाठ एक उजेडात येत आहे. हा घटनाक्रम लक्षात घेता मी ते वक्तव्य केलं होतं, असं स्पष्टीकरण सपकाळ यांनी दिलं.

# वर्षभरात ४२ हत्या, ५२ हाफ मर्डर, 'या' जिल्ह्यात गुन्हेगारीचा कळस !

**अक्षराज : वृत्तसंकलन**


**दि.२२, चंद्रपूर :** मागील काही वर्षात चंद्रपूर जिल्ह्यात गुन्हेगारी वाढली आहे. २०२४ या वर्षात ४२ हत्या झाल्या आहेत. तर जीवघेणे हल्ले ५२ झाले आहेत. चालू वर्षात दोन महिन्यात तीन हत्या, तीन हाफ मर्डरच्या घटना पुढे आल्यात. समोर आलेले आकडे धडकी भरविणारे आहेत. वाढत्या गुन्हेगारीच्या घटना पाहाता चंद्रपूरची नवी ओळख निर्माण होत आहे की काय अशी भिती निर्माण झाली आहे. त्याला आळा कसा घालायचा असा प्रश्न आहे पोलिस प्रशासनाला पडला आहे.

जिल्ह्याचे पालकमंत्री अशोक उईके यांनी जिल्हातील कायदा, सुव्यवस्था उत्तम असल्याचे म्हटले आहे. सोबतच पोलीस प्रशासनाच्या कामागिरीवर ही समाधान व्यक्त केलं आहे. पोलिस दलाला ही त्यांनी शाबासकीची थाप दिली आहे. चंद्रपूर जिल्हा म्हटलं की, डोळ्यापुढे उभा असतो ताडोबाचा हिरवागार परिसर. येथे असलेले वाघ, दुर्मिळ वन्यजीव. तसेच येथील तप्त ऊन. ब्लॅकगोल्ड सिटी अशीही या शहराची ओळख आहे. तसं बघितलं तर हा एक शांत जिल्हा म्हणून ही ओळखला जातो. मात्र काही वर्षापासून येथे गुन्हेगारीने डोके वर काढले आहे. गोळीबार, हत्या, दरोडे, चोरीच्या घटनांचा आलेख वाढतच चालला आहे. मागील दोन वर्षाचे आकडे बघितल्यावर हे तेच चंद्रपूर आहे काय, असा प्रश्न पडल्या शिवाय रहात नाही. २०२३ या वर्षात हत्येच्या ३१ घटना घडल्या होत्या. तर हाफ मर्डरच्या ५० घटना समोर आल्या.




खरंतर २०२४ मध्ये यात घट व्हायला हवी होती. मात्र तसं होताना दिसत नाही. २०२४ मध्ये हत्येच्या घटनेत वाढ झाली आहे. एकूण ४२ हत्यांनी चंद्रपूर हादरले आहे. २०२५ मध्ये केवळ जानेवारी आणि फेब्रुवारी या दोन म हिन्यात तीन हत्या आणि तीन हाफ मर्डर झाले आहेत. चंद्रपूरातील वाढतील गुन्हेगारी बघता आमदार किशोर जोरगेवार यांनी विधानसभेत प्रश्न उपस्थित केला होता. किमान पुढील दहा महिन्यात गुन्हेगारीच्या वाढत्या आलेखाला उतरती कळा लागेल, अशी माफक अपेक्षा चंद्रपूरकरांची आहे.

# मेरठ हत्याकांडात धक्कादायक माहिती समोर... 'सौरभच्या छातीत' तीन वेळा वार कर...



उत्तर प्रदेशमधील मेरठमध्ये काही दिवसांपूर्वी एक धक्कादायक घटना घडली. मुस्कान रस्तोगी नामक म हिलेने तिचा प्रियकर साहिल शुक्लाला बरोबर घेऊन पती सौरभ राजपूतची हत्या केली. हत्या केल्यानंतर मृतदेहाचे १५ तुकडे केले आणि ते एका ड्रममध्ये भरून वरून काँक्रिट ओतलं. एवढंच नाही तर यानंतर मुस्कान रस्तोगी आणि तिचा प्रियकर साहिल शुक्ला हे दोघे त्यानंतर हिमाचल प्रदेशला फिरायला गेले. दरम्यान, या घटनेनंतर पोलिसांनी आरोपी मुस्कान रस्तोगी आणि तिचा प्रियकर साहिल शुक्लाला बेड्या ठोकल्या आहेत.

सौरभ राजपूतच्या हत्येच्या घटनेबाबत आता अनेक भयानक खुलासे समोर येत आहेत. शवविच्छेदन अहवाल समोर आला असून त्यामध्ये धक्कादायक गोष्टी समोर आल्या आहेत. हत्या करताना मुस्कान रस्तोगी तिच्या बेशुद्ध पती सौरभ राजपूतच्या छातीवर बसली होती, तेव्हा तिचा प्रियकर साहिल शुक्लाने तिला चाकू दिला आणि सौरभच्या छातीत तीन वेळा वार करण्यास सांगितलं होतं. राजपूतच्या छातीत तीन वेळा वार करण्यात आले होते, अशी माहिती आता शवविच्छेदन अहवालातून समोर आली आहे. सौरभ राजपूतची हत्या करताना त्याची पत्नी मुस्कान घाबरत होती. मात्र, तेव्हा तिचा प्रियकर साहिलने तिचा हात धरला आणि बेशुद्ध सौरभच्या छातीवर तीन वार करायला लावल्याचंही वृत्तात म्हटलं आहे. तसेच सौरभ राजपूतची मान कापलेली, त्याचे पाय कापलेले आणि धड तुटलेले होते, अशी माहिती शवविच्छेदनाच्या प्रक्रियेत सहभागी असलेल्या डॉक्टरांनी दिल्याचं वृत्तात म्हटलं आहे. शवविच्छेदनात असं आढळून आलं की, मारेकऱ्यांनी सौरभ राजपूतवर चाकूने क्रूरपणे वार केले होते. छातीवर इतक्या जोरात वार करण्यात आले होते की चाकू आत खोलवर घुसला आणि त्याला गंभीर दुखापत झाली. पाय मागे वाकलेले होते, इतके कडक झाले होते की ते सरळ करता येत नव्हते आणि शरीराचे तुकडे झाले होते. मान वेगळी झाली होती, हात कापले गेले होते आणि धड वेगळे झाले होते, असं एका डॉक्टरांनी सांगितलं.

कोण आहे मुस्कान रस्तोगी?

मुस्कान रस्तोगी २७ वर्षांची असून २०१६ साली तिने सौरभ राजपूतशी लग्न केले होते. या लग्नाला दोन्ही कुटुंबाचा विरोध होता. सौरभने मुस्कानसाठी त्याच्या कुटुंबियांना सोडले होते. दोघेही मेरठमध्ये भाड्याच्या घरात राहत होते. मुस्कानने २०१९ साली एका मुलीला जन्म दिला. मुलीला जन्म दिल्यानंतर मुस्कान आणि तिचा बालपणीचा मित्र साहिल शुक्ला पुन्हा एकदा भेटले आणि त्यांच्यात संबंध सुरू झाले. मुस्कान आणि साहिल इयत्ता आठवीपर्यंत एकाच वर्गात होते.

# जलयुक्त शिवार अभियानात जिल्ह्यातील ३६८ गावांची निवड

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२२, अहिल्यानगर :** जिल्ह्यातील जलस्रोतांच्या पुनरूज्जीवनासाठी अत्यंत उपयुक्त असलेल्या गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार तसेच जलयुक्त शिवार या योजना जिल्ह्यात मोहिम स्तरावर राबविण्याच्या सुचना जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिल्या. जिल्ह्यातील ३६८ गावांची जलयुक्त शिवार अभियानात निवड करण्यात आली आहे.

योजनेंतर्गत या गावात करण्यात येणाऱ्या कामांना १०० टक्के प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही संबंधित यंत्रणांनी करावी, अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित गाळम ुक्त धरण, गाळयुक्त शिवार योजना व जलयुक्त शिवार योजनेच्या आढावा बैठकीत ते बोलत होते.

बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, जिल्हा जलसंधारण अधिकारी पी. बी. गायसमुद्रे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, सहायक वनसंरक्षक अश्विनी दिघे, जिल्हा परिषदेचे जलसंधारण अधिकारी शिवम डापकर, भारतीय जैन संघटनेचे प्रतिनिधी नरेश सुराणा, आनंद भंडारी, आदेश चंगेडीया, टाटा मोटर्सचे संग्राम खलाटे आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी डॉ.आशिया म्हणाले, पडणाऱ्या प्रत्येक पावसाचा थेंब न् थेंब जमिनीत जिरवण्यासाठी तसेच अडविण्यासाठी गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार तसेच जलयुक्त शिवार २.० या योजनांची कामे अतिशय नियोजनबद्धरितीने करण्यात यावीत.



५ एप्रिलपर्यंत गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार या योजनेच्या प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता देण्याचे काम पूर्ण करावे. योजनेअंतर्गत ३०० बंधाऱ्यांचे खोलीकरण व रुंदीकरणाची कामे यशस्वीरीत्या पूर्ण करावी. योजनेबाबत गावागावात व्यापक स्वरूपात जागृती करण्यात यावी. तसेच विविध अशासकीय सेवाभावी संस्थांनी या कामी आवश्यक ती मदत करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी केल्या.

## थोडक्यात

### रेल्वे भुयारी रस्त्यासाठी ग्रामस्थांचा एल्गार

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.२२, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड तालुक्यातील रेल्वे पाथरड गावात जाणाऱ्या रेल्वे भुयारी रस्त्याचे काम गेल्या अनेक वर्षांपासून रखडले असुन गावाकऱ्यांना काट्या कुपाट्यातून पायपिट करावी लागत असल्याने सरपंच कैलास पाटील यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे धाव घेतली असुन पुन्हा आमरण उपोषणाचा इशारा देत एल्गार पुकारला आहे.

रेल्वे पाथरड गावास जाण्यायेण्यासाठी एकमेव सोईचा मार्ग आहे. याशिवाय विद्यार्थ्यांना शाळेला जाण्या येण्यासाठी हाच मार्ग आहे. या रस्त्यासाठी कोट्यावधीचा निधी खर्च करून ही रेल्वे भुयारी मार्ग मात्र अजूनही पूर्ववत सुरु झालेला नाही. शेतकरी व प्रशासनच्या वादात भुयारी रस्त्याचे काम मात्र रखडलेले आहे. ब्राह्मणवाडा मार्गे रस्त्याचा पर्याय असला तरी हेलपाटे मारून उलट्या मार्गाने यावे लागते. यासाठी वेळ तसेच जास्तीचे अंतर मोजावे लागते. यासाठी सरपंच कैलास पाटील पाथरडकर यांनी अनेक वेळा संबंधित प्रशासन तसेच लोकप्रतिनिधी यांच्या कडे अनेक वेळा चकरा मारून ही आंदोलन आमरण उपोषण करून ही भुयारी रस्त्याचा प्रश्न सुटलेला नाही.

रेल्वे अंडर ग्राउंड ब्रिज रस्त्यासाठी ग्रामस्थांनी आक्रमक भूमिका घेत एल्गार पुकारला आहे. रस्त्याचा शेजारील दोन्ही बाजूच्या शेतकऱ्यांनी अनेकदा रस्त्यावर पाणी सोडून नाहक त्रास देऊन ग्रामस्थांना वेटीस धरले जात आहे असे निवेदनात नमूद केले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून रहदारीचा मार्ग बंद असल्याने भुयारी रस्त्याचे काम दि.३० मार्च २०२५ पूर्वी करण्यात यावे अन्यथा दि.२ एप्रिल २०२५ पासून गावाच्या हितासाठी आम रण उपोषण सुरु करण्याचा इशारा सरपंच कैलास पाटील पाथरडकर, उपसरपंच जयवंत थोरात यांनी दिला आहे.

### नांदेडसाठी मध्य रेल्वेच्या मुंबई विभागातून विशेष गाड्या

**दि.२२, मुंबई :** उन्हाळ्याच्या सुट्टीच्या कालावधीत प्रवाशांची नियमित रेल्वे गाड्यांव्यतिरिक्त उन्हाळी विशेष रेल्वे गाड्या चालवणार आहे. त्याचबरोबर नांदेडला जाण्यासाठी मध्य रेल्वेच्या मुंबई विभागातून गाडी धावणार आहे. या रेल्वेगाडीच्या २४ अतिरिक्त फेऱ्या होतील. त्यामुळे मध्य रेल्वेने चालवलेल्या उन्हाळी विशेष गाड्यांची एकूण संख्या आता ३५६ झाली आहे. मध्य रेल्वेच्या मुंबई विभागातील लोकमान्य टिळक टर्मिनस (एलटीटी) येथून हुजूर साहेब नांदेड येथे गाडी धावणार आहे. एप्रिल महिन्याच्या सुरुवातीपासून ही गाडी सुरू होणार असून ती जून अखेरीपर्यंत रेल्वेगाडी धावेल. मध्य रेल्वेने दिलेल्या माहितीनुसार गाडी क्रमांक ०११०५ ही साप्ताहिक विशेष रेल्वेगाडी ९ एप्रिल ते २०२५ ते २५ जून २०२५ पर्यंत दर बुधवारी लोकमान्य टिळक टर्मिनस येथून रात्री १२.५५ वाजता सुटेल आणि नांदेड येथे त्याच दिवशी सायंकाळी ७ वाजता पोहोचेल. गाडी क्रमांक ०११०६ ही साप्ताहिक विशेष रेल्वेगाडी ९ एप्रिल २०२५ ते २५ जून २०२५ पर्यंत दर बुधवारी नांदेड येथून रात्री ८ वाजता सुटेल आणि लोकमान्य टिळक टर्मिनस येथे दुसऱ्या दिवशी दुपारी २.४५ वाजता पोहोचेल.

## संपादकीय



### जरा याद करो कुर्बानी...

दीडशे ते दोनशे वर्ष इंग्रजांच्या पारतंत्र्यात असणाऱ्या भारत मातेला इंग्रजांच्या गुलाम ीतून मुक्त करण्यासाठी हजारो स्वातंत्र्य सैनिकांनी स्वतःच्या जीवाचे बलिदान दिले. अनेक जण फासावर चढले तर कित्येकांनी इंग्रजांच्या गोळ्या छातीवर झेलल्या. या वीर स्वातंत्र्य सैनिकांच्या बलिदानाने १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत माता इंग्रजांच्या गुलामीतूम मुक्त झाली. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी अनेक स्वातंत्र्य सैनिकांनी छातीवर गोळ्या झेलल्या तर अनेक स्वातंत्र्य सैनिक हसत हसत फासावर चढले. भगत सिंग, राजगुरू आणि सुखदेव हे स्वातंत्र्य सैनिक देखील भारत मातेला इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी हसत हसत फासावर चढले आणि शहीद झाले. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी आपल्या जीवाची बाजी लावणारे स्वातंत्र्य सैनिक शहीद भगतसिंग, राजगुरु व सुखदेव यांना २३ मार्च १९३१ रोजी इंग्रजांनी फाशी दिली होती. आज २३ मार्च हा दिवस शहीदांच्या नावे कोरला गेला गेला आहे. आजच्याच दिवशी म्हणजे २३ मार्च १९३१ रोजी शहीद भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी स्वतः च्या प्राणाचे बलिदान दिले. ९४ वर्षांपूर्वी आजच्याच दिवशी इंग्रजांनी भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांना फाशी दिली होती. देशासाठी प्राणाची आहुती देणाऱ्या शहिदांना आदरांजली वाहण्यासाठी आजचा दिवस संपूर्ण देशात शहीद दिवस म्हणून साजरा केला जातो. १९२८ मध्ये सायमन कमिशन नावाचे शिष्टमंडळ भारतात आले होते. या कमिशनला विरोध म्हणून लाला लजपतराय यांनी मोठा मोर्चा काढला होता. सायमन कमिशनला विरोध करणाऱ्या लाला लजपतराय यांच्यावर इंग्रजांनी लाठीहल्ला केला. या लाठी हल्ल्यात लाला लजपतराय गंभीर जखमी झाले त्यातच त्यांचा मृत्यू झाला. लाला लजपतराय यांच्या मृत्यूनंतर संपूर्ण देशात इंग्रजांविरुद्ध संतापाची लाट उसळली. लाला लजपतराय यांच्या मृत्युनंतर देशातील जहाल गटाचे स्वातंत्र्य सैनिक कम ालीचे चिडले. चंद्रशेखर आझाद, भगतसिंग, राजगुरु, सुखदेव आणि अन्य जहाल क्रांतिकारकांनी लाला लजपतराय यांच्या मृत्यूचा बदला घेण्याची शपथ घेतली. लाला लजपतराय यांच्या मृत्यूच्या एक महिन्याच्या आतच या क्रांतिकारकांनी आपली शपथ पूर्ण केली आणि १७ डिसेंबर १९२८ रोजी ब्रिटिश अधिकारी सँडर्सला गोळ्या घालून ठार केले. काही काळ ते भूमिगत राहिले मात्र फितुरीम ुळे ते पोलिसांच्या हाती लागले. ७ ऑक्टोबर १९३० रोजी इंग्लिश कोर्टाने भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांना फाशीची शिक्षा सुनावली. यानंतर भगतसिंग यांची शिक्षा कमी व्हावी यासाठी फेर याचिका दाखल करण्यात आली मात्र १० मार्च १९३१ रोजी ती याचिका कोर्टाने फेटाळली. २३ मार्च हा दिवस भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांच्या फाशीसाठी निश्चित करण्यात आला. २३ मार्च १९३१ रोजी सकाळी ७ वाजून ३३ मिनिटांनी भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांना फाशी देण्यात आली. फाशीच्या वेळी या तिघांनी मेरा रंग दे बसंती चोला ...... हे गाणे गायले. फासावर लटकतानाही भारत मातेच्या या सुपुत्रांच्या चेहऱ्यावर कसल्याही प्रकारचे दुःख किंवा पश्चाताप नव्हता उलट भारत मातेसाठी फासावर जात असल्याचा अभिमान होता. आजच्या दिवशी भारत मातेला इंग्रजांच्या गुलामीतूम मुक्त करण्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या क्रांतिकारकांच्या बलिदानाचे स्म रण करणे हे प्रत्येक भारतीयांचे कर्तव्य आहे. भारत मातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या असंख्य ज्ञात अज्ञात शहिदांना शाहिद दिनी विनम्र अभिवादन!

# सुनिता विल्यम्स तुस्सी ग्रेट हो !

एखाद्या बालकाचा जन्म आईच्या गर्भातून नऊ महिने नऊ दिवस पूर्ण झाल्यानंतर होतो. एवढा संयम ती माता आणि तिचे बालक बाळगत असते. शेवटी तो सुवर्ण दिन उगवतो आणि तो नवीन जीव पृथ्वीतलावर अवतारातो. त्याचे जन्मने सर्वात प्रिय असते ते त्याच्या मातेला. कारण तिने दिलेल्या संयमाच्या परीक्षेचा तो निकाल असतो. असंच काहीसं घडलं सुनिता विल्यम्सच्या बाबतीत... तिने नऊ महिने बाळगलेल्या कठोर संयमाचे, आत्म विश्वासाचे, जिद्द, धाडस, धैर्याचे फलित म्हणजे तिचे यशस्वीरीत्या पृथ्वीवर परत येणे होय!

सुनीता विल्यम्स, या भारतीय-अमेरिकन अंतराळवीरंगणेकडे मागील नऊ महिन्यापासून साऱ्या जगाचे लक्ष लागले होते. भारतीय प्रमाणवेळेनुसार, बुधवारी १९ मार्चच्या पहाटे सुनीता विल्यम्स, बुच विल्मोर, निक हेग आणि रशियन अंतराळवीर गोर्बूनोव्ह स्पेस एक्सच्या ड्रॅगन या अंतराळयानातून पृथ्वीवर परतले. तिचे सहकारी बुच विल्मोरसह आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर (ISS) त्या मागील नऊ महिन्यापासून होत्या. बोईंगच्या स्टारलाइनर स्पेसक्राफ्टमध्ये अनेक तांत्रिक समस्यांमुळे त्यांना परत येण्यास विलंब होत होता.

नासामधील भारतीय वंशाच्या अंतराळवीर सुनीता विल्यम्स आणि त्यांचे सहकारी बुच विल्मोर ५ जून २०२४ रोजी आठ दिवसांसाठी बोईंग स्टारलायनरच्या चाचणी मोहिमेसाठी अंतराळात गेले होते. यानात बिघाड झाल्यामुळे त्यांच्या परतीच्या मार्गात अडचणी निर्माण झाल्या होत्या . परतीचा प्रवास सुरू होताच या रॉकेट मध्ये काही तांत्रिक बिघाड सुरु झाले . रॉकेटला पुढे जाण्यासाठी असणाऱ्या प्रोफेलशिल सिस्टीम मध्ये बिघाड झाला. यामध्ये असणाऱ्या हेलियम वायूची गळती सुरू झाली. खरंतर ही गळती अंतराळ मोहीम सुरू झाल्यापासूनच होत होती. तरीसुद्धा ही मोहीम आरंभली गेली. त्याचबरोबर इतर अनेक तांत्रिक बिघाडामुळे या दोघांचे परत येणे लांबणीवर गेले होते. पृथ्वीपासून सुमारे साडेतीनशे किलोमीटर उंचीवर ताशी अंदाजे २८ हजार किलोमीटर वेगाने हे अंतराळस्थान पृथ्वीभोवती घिरट्या घालत आहे.

त्या दोघांचा मुक्काम वाढत गेल्यास तज्ञांनी पुढील अंदाज व्यक्त केले होते - सूक्ष्म गुरुत्वाकर्षणामुळे त्यांच्या हाडावर परिणाम होऊ शकतो. त्यांच्या दृष्टीवर व डीएनए च्या संरचनेवर देखील पुढील काळात परिणाम होऊ शकतो. उंची आणि केस वेगाने वाढू शकतात.किरणोत्सवर्गामुळे रक्तातील लाल पेशींचा झपाट्याने क्षय होइल. त्याचबरोबर अंतराळ स्थानावर असणाऱ्या ६० डेसिबल पेक्षा जास्त आवाजामुळे त्यांच्या कर्ण पटलांवर देखील परिणाम होऊ शकतो. आता ते दोघे परतल्यानंतर या सर्व गोष्टींची पडताळणी होऊन योग्य ते उपचार त्यांना घ्यावे लागणार आहेत.

२००३ मध्ये कोलंबिया अंतराळयान पृथ्वीच्या कक्षेत शिरत असताना त्याचे भाग वेगवेगळे झाले आणि यातीलही सात अंतराळवीर मारले गेले होते. भारतीय वंशाच्या अंतराळवीर कल्पना चावला या याच दुर्घटनेत मृत्युमुखी पडल्या होत्या. यामुळे सुनिता विल्यमबाबत भारतीय लोकांमध्ये जास्तीची चिंता निर्माण झाली होती.

सुनिता आणि बुच यांना परत आणण्यासाठी स्पेस एक्स ड्रॅगन हे अंतराळ यान तयार करण्यात आले. जे उद्योगपती एलॉन मस्क



यांच्या स्पेस एक्स कंपनीने विकसित केलं होतं. स्पेस एक्सच्या अवकाशयानाने क्रू-९ ड्रॅगन या अवकाशयानाने १४ मार्च रोजी दोघांना परत आणण्यासाठी पृथ्वीवरून उड्डाण केलं आणि ते यान दोन्ही अंतराळवीरांना घेऊन परतले.

यापूर्वी सन २००६ मध्ये सुनीता विल्यम्स आपल्या पहिल्या अंतराळ मोहिमेवर गेल्या. त्यांनी तब्बल १९५ दिवस आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात (ISS) घालवले, जे त्या काळात एका महिलेचा विक्रम होता. पण अंतराळ प्रवास हा सहज सोपा नसतो. शून्य गुरुत्वाकर्षण, मर्यादित संसाधने आणि पृथ्वीपासून खूप दूर असणे – हे सर्वच आव्हानात्मक असत.सुनीता विल्यम्स यांनी एकदा सांगितले होते –

जर तुम्हाला अंतराळवीर बनायचं असेल, पायलट व्हायचं असेल किंवा कोणतेही मोठे ध्येय गाठायचे असेल, तर त्यासाठी मेहनत करावी लागेल. संकटे येतील, अपयश मिळेल, पण जर तुम्ही तुमच्या ध्येयावर ठाम राहिलात, तर तुम्हाला कोणीही थांबवू शकत नाही! परतल्यानंतर सुनीता विल्यम्स प्रतिक्रिया देताना सांगितले की, दररोज, मी माझ्या आतील भीतींवर मात केली, स्वतःला एकत्र आणले, माझे संशोधन चालू ठेवले आणि विश्वास ठेवला - मी परत येईन! सुनीता विल्यम्स यांनी तेथे ९०० तासाच्या संशोधनात १५० हून अधिक प्रयोग केले. अंतराळ स्थानाची देखभाल केली. तेथील हार्डवेअर बदलले. सूक्ष्म गुरुत्वाकर्षणाचा द्रव पदार्थावर काय परिणाम होतो, यावर संशोधन केले. दीर्घ मोहिमांसाठी इंधन सेल भट्ट्या कशा बनवता येतील. याचे विशेष संशोधन केले. त्यांचे जैव पोषकावरील संशोधन अंतराळवीरांच्या जीवनसत्व व खनिज पूर्ततेच्या पद्धती बदलवू शकते.

सुनीता विल्यम्स यांच्या अभूतपूर्व काम गिरीबद्दल सर्व भारतीयांना अभिमान आहे. इस्रो पुढील काळात महिलांच्या नेतृत्वाखाली मानव युक्त अवकाशीय महिमा काढणार आहे. अशा काळात सर्व भारतीय महिलांना सुनीता विल्यम्स या 'दीपस्तंभ' ठरतील. ' चूल आणि मूल ' या व्यवस्थेमध्ये अडकलेल्या भारतीय महिलांना मुक्त अवकाश भविष्यात भरारी घेण्यासाठी खुणावत आहे. सुनीता विल्यम्स च्या काम गिरीच्या रूपाने त्यांच्या पंखांना नक्कीच बळ मिळणार आहे.

**- किशोर जाधव सोलापूर**
**- मो. नं. ९९२२८८२५४१**

## शिवरायांच्या नावापुढे छत्रपती आणि नावानंतर महाराज लावले गेलेच पाहिजे !

कोल्हापूर येथील 'शिवाजी विद्यापीठ', चे 'छत्रपती शिवाजी महाराज विद्यापीठ', असा नामविस्तार करण्यात यावा या मागणीसाठी हिंदु जनजागृती समिती आणि हिंदु राष्ट्र समन्वय समिती यांनी हल्लीच जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा काढल्याचे वृत्त वाचनात आले. या मोर्च्यामध्ये हजारो शिवप्रेमी नागरिकांनी सहभाग घेतला होता. मुळात अशा प्रकारच्या मागणीसाठी हिंदुत्ववादी संघटनांना मोर्चे काढावे लागतात हीच या महाराष्ट्राची शोकांतिका आहे. ज्या महाराजांनी त्यांच्या जाज्वल्य पराक्रमाने आणि बुद्धिचातुर्याने तत्कालीन पाच पातशाह्यांना धूळ चारली, रयतेला भयमुक्त केले, ज्यांनी महाराष्ट्र घडवला अशा छत्रपती शिवरायांचा केवळ 'शिवाजी' असा एकेरी उल्लेख असलेले विद्यापीठाचे नाव म्हणजे महाराजांचा अवमानच आहे. अत्यंत प्रतिकूल काळात हिंदवी स्वराज्य स्थापन करणारे आणि रयतेच्या कल्याणासाठी राज्याभिषेक करवून घेणारे छत्रपती शिवाजी महाराज हे एकमेवाद्वितीय उदाहरण असून प्रत्येक वेळी महाराजांच्या नावापुढे छत्रपती आणि नावानंतर महाराज हे विशेषण लावणे हा त्यांचा यथोचित सन्मानच नव्हे तर आपल्या प्रत्येकाचे कर्तव्य आहे. राज्यात प्रदीर्घ काळ सत्तेत असणाऱ्या तत्कालीन राज्यकर्त्यांनी महाराजांना योग्य तो सन्मान दिला नसला, तरी सध्या सत्तेवर असलेल्या त्रिपक्षीय सरकारमधील दोन प्रमुख पक्ष हे हिंदुत्ववादी विचारसरणीचे आहेत, त्यामुळे त्यांनी या बाबीकडे गांभीर्याने लक्ष देण्याची आवश्यकता आहे. केवळ विद्यापीठ नव्हे, तर आज राज्यात अनेक चौक, नगर, मार्ग, क्रीडांगण, बाग-बगीचे, तळी यांना 'शिवाजी' असे एकेरी नाव दिलेले जागोजागी निदर्शनास येते. हा महाराजांचा अवमानच आहे. मुंबईतील शिवप्रेमी जनतेने आंदोलने केल्यानंतर मुंबईतील प्रमुख रेल्वे स्थानकाचा आणि आंतरराष्ट्रीय विमानतळाचा नामविस्तार अनुक्रमे छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस आणि छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ असा करण्यात आला. छत्रपती शिवरायांच्या महाराष्ट्रात महाराजांच्या सन्मानासाठी आंदोलने करावी लागणे हे योग्य नसून राज्य सरकारने याबाबत स्वतःहून अध्यादेश काढून ज्या ज्या ठिकाणी 'शिवाजी' असा एकेरी उल्लेख असेल अशा ठिकाणची नावे बदलून छत्रपती शिवाजी महाराज असा नामविस्तार करावा.

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई ९६६४५५९७८०**

### दंगलशरीर...

डोके नसते दंगलीस
असतात लाख पाय
अस्ताव्यस्त कशीही
केंव्हाही पसरतजाय

कितीतर राक्षसीबाप
पुढे येतचं नाही माय
रहस्यमय उगमस्थान
उधळत जा ठायठायं

आंधळी पुरती दंगल
होऊनजाते असहाय
प्रगतीचा वावर जिथे
तिथे आणते अंतराय

कधी नसते सावधान
दावत ना अचिरकाय
अस्ताव्यस्त उधळली
करणारं कोण मनायं

भडकवत रहा असूरां
काहींचा हा व्यवसाय
गरीब मरे जीवानिशी
फुकट खा लोणीसाय


पापभिरू सामान्यांवर
कशासाठी हा अन्याय
लुळेपांगळे सगळेकसे
अगतिक अन्अनुपाय

भडकण्याआधी दंगल
करा गांभिर्ये स्वाध्याय
दंगली नंतर कारवाया
कधी बदलता अध्याय

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६..**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

## राम सुतार यांचा वयाच्या १०० व्या वर्षी महाराष्ट्र भूषण पुरस्काराने गौरव



जगभरात भारताची मान अभिमानानं उंचावणारा गुजरातमधील स्टॅच्यु ऑफ युनिटी अर्थात सरदार वल्लभभाई पटेल यांचा पुतळा घडवणारे ज्येष्ठ शिल्पकार राम सुतार यांना यंदाचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार जाहीर झाला आहे. महाराष्ट्रचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत यासंदर्भातली घोषणा केली आहे. २५ लाख रुपये, मानचिन्ह, म ानपत्र व शाल असं या पुरस्काराचं स्वरूप असून या माध्यमातून राम सुतार यांच्या कामाचा गौरव केला जाणार आहे. महाराष्ट्र भूषण पुरस्कार हा राज्याचा सर्वोच्च नागरी पुरस्कार महाराष्ट्र सरकारकडून दरवर्षी देण्यात येतो. १२ मार्च २०२५ रोजी मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या निवड समितीच्या बैठकीत महाराष्ट्र भूषण २०२५ या पुरस्कारासाठी ज्येष्ठ शिल्पकार राम सुतार यांच्या नावाला मान्यता देण्यात आली आहे. राम सुतार यांचं वय १०० वर्षं आहे. अजूनही ते शिल्प तयार करत आहेत. कोकणात उभारल्या जाणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचं कामदेखील राम सुतार यांनाच देण्यात आलं आहे. चैत्यभूमी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकासाठीची मूर्तीही राम सुतार हेच घडवत आहेत, अशी माहिती देवेंद्र फडणवीसांनी विधानसभेत दिली.

राम सुतार हे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे मुक्त शिल्पकार आहेत. यांचा जन्म इ.स. १९२५ मध्ये धुळे जिल्ह्यातील गोंदूर येथे झाला. सुतार यांनी २००हून अधिक शिल्पे जगातील पाचही खंडांत बनवली आहेत. दिल्ली येथील संसद भवनाच्या प्रांगणात राम सुतार यांची शिल्पे आहेत.वडील लोहारकाम आणि सुतारकाम करीत असत. शेतीची अवजारे तयार करणे, बैलगाडी बनविणे, लाकडावर कोरीव काम करणे,मातीची खेळणी बनविणे, शेणाने सारवलेल्या भिंतीवर चित्रे रंगविणे वगैरे गोष्टी ते लहानवयातच शिकले. त्यांच्या धुळे जिल्ह्यातील गोंडूर गावात शिक्षणाची सोय उपलब्ध नसल्यामुळे त्यांनी मॅट्रिकपर्यंत शिक्षण आपल्या नातेवाईकांकडे राहून अतिशय कष्टाने पूर्ण केले. मुंबई येथे त्यांनी श्रीराम कृ.जोशी ह्यांच्या मार्गदर्शनानुसार सर जे.जे. स्कूल ऑफ आर्ट मध्ये प्रवेश घेऊन १९५३ साली शिल्पकलेत प्रथम वर्गात पदविका मिळविली. त्यांच्या शिल्पकार म्हणून कारकिर्दीला सन १९६० मध्ये चंबळ नदीच्या सीमेंट-कॉन्क्रीटच्या प्रतिकात्म क शिल्पाकृती ने झाली. हे शिल्प चंबळ नदीवरील गांधीसागर धरणाच्या ठिकाणी आहे.

इ.स. १९५२ मध्ये सर जे. जे. आर्टस कॉलेजमध्ये शिल्पकलेची पदवी मिळवली. यावेळी त्यांना मानाचे सुवर्णपदक मिळाले. इ.स. १९५४ मध्ये भारतीय पुरातत्त्व खात्यात नोकरीची सुरुवात - औरंगाबाद येथे केली. अजिंठा-वेरूळ लेण्यांम धील खराब झालेल्या शिल्पांची डागडुजी करण्याचे काम त्यांनी केले. इ.स.१९५८मध्ये त्यांनी दिल्लीला स्थलांतर केले. ज्येष्ठ शिल्पकार राम सुतार ह्यांनी १९ फेब्रुवारी २०२५ रोजी वयाची शंभरी पार केली. त्यांच्या पंचाहत्तर वर्षाच्या शिल्प घडविण्याच्या कारकिर्दीत त्यांनी व्यक्तिशिल्पे,म्युरल्स, एखाद्या संकल्पनेला धरून शिल्प असे अनेक शिल्पकला प्रकार हाताळले. दिल्लीत त्यांनी व्यक्तींचे सुमारे पन्नास पुतळे बनविले.त्यांनी बनविलेल्या शिल्पाकृती संसदभवन,राष्ट्रपती भवन आणि विविध राज्ये,आणि देशविदेशात आहेत. ते कधीही गुणवत्तेशी तडजोड करीत नाहीत. त्यांनी आकाराने मोठे तसेच संख्येने म ोठे असे अनेक पुतळे बनविले. विचारमग्न अवस्थेत असलेले महात्मा गांधी यांचे संसदभवन येथील कलात्मक व्यक्तीशिल्प आणि वल्लभभाई पटेल ह्यांचे सरदार सरोवर येथील उत्तुंग शिल्प ही त्यांची सर्वात लोकप्रिय शिल्पे आहेत.

धुळे तालुक्यातील गोंदूर या गावाचे सुपुत्र असलेल्या राम सुतार यांनी अयोध्येत भगवान श्रीरामाची २१५ फूट उंच मूर्ती, सरदार सरोवर येथील ५५० फूट उंचीचा सरदार वल्लभभाई पटेल यांचा पुतळा, दिल्लीतील राजीव गांधी यांचे योगदान सांगणारे भित्तिशिल्प, संसद भवनाच्या आवारातील अनेक पुतळे आणि देशभरात प्रत्येक राज्यात त्यांनी आपल्या शिल्पकलेचा साक्षात्कार घडविला आहे. त्यांच्या स्टुडिओत घडलेले म. गांधीचे ३५० अर्धपुतळे भारत सरकारने १७० देशांना भेट म्हणून दिलेले आहेत. इ.स.१९९९ - पद्मश्री पुरस्कार देऊन भारत सरकारने त्यांचा गौरव केला. इ.स.२०१०- दि बॉम्बे आर्ट सोसायटीचा रूपधर जीवनगौरव पुरस्कार.यांना केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालयाकडून देण्यात येणारा २०१६ या वर्षासाठीचा टागोर पुरस्कार देण्यात आला.एक कोटी रुपये, प्रमाणपत्र आणि पारंपारिक हस्तकला शिल्प असे या पुरस्काराचे स्वरूप होते. सांस्कृतिक पुरस्कार २०१८ ला प्रदान करण्यात आला. यंदाचा महाराष्ट्र शासनाचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार २०२५ जेष्ठ शिल्पकार खान्देश भूषण, पद्मश्री राम सुतार यांना जाहीर झाला आहे त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन!!!!

*** लेखक ***
**श्रीराम महाजन**
**कलाशिक्षक**
**चेंबूर कर्नाटका हायस्कूल. चेंबूर. मुंबई**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## नेमबाजीत एक दशांश गुणाने स्वरूपने मारली बाजी
## महाराष्ट्राला सुवर्णासह रौप्य




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२२, नवी दिल्ली :** खेलो इंडिया पॅरा स्पर्धेत शेवटच्या क्षणापर्यंत रंगलेल्या नेमबाजीतील लढतीत महाराष्ट्राच्या स्वरूप उन्हाळकरने एक दशांश गुणाने सुवर्णपदकावर नाव कोरले. १० मीटर रायफल नेमबाजीतील एस.एच १ प्रकारात स्वरूपसोबत कविन केगनाळकरने रूपेरी यश संपादन केले.

डॉ.कर्णीसिंग शूटिंग रेंजवर सुरू असलेल्या नेमबाजीत स्पर्धेतील पहिल्याच अंतिम फेरीत महाराष्ट्राच्या डबल धमाका पहाण्यास मिळाला. १० मीटर रायफल नेमबाजीतील एस.एच १ प्रकारात पात्रता फेरीत कोल्हापूरचा स्वरूप उन्हाळकर चौथा स्थानावर होता. अंतिम लढतीत अनुभव संपन्न स्वरूपने १६व्या फेरीपर्यंत प्रथम स्थानावर आघाडी घेतली होती. १७ व्या फेरीत ९.१ गुणांमुळे तो चौथा स्थानावर फेकला गेला. तर अनपेक्षितपणे चौथ्या स्थानावर असणारा १५ वर्षीय कविन केगनाळकरने पहिल्या स्थानी मुसंडी मारली. पदक निश्चित करणार्या २०व्या फेरीत स्वरूपने आपल्या लौकिकला साजेसा खेळ करीत पुन्हा आघाडी घेत दुसरे स्थान प्राप्त केले.शेवटच्या २३ व २४ फेरीत सुवर्णपदकासाठी महाराष्ट्राच्या स्वरूप उन्हाळकर व कविन केगनाळकरमध्ये कमालीची झुंज दिसून आली. २२४.२ गुणांसह कविन आघाडीवर तर पाईंट १ गुणांनी स्वरूप दुसर्या स्थानावर होता. २३व्या फेरीत गुणांची बरोबरी करीत अखेरच्या २४व्या फेरीत १०.७ गुणांचा अचूक वेध घेत अवघ्या एका गुणांनी स्परूपने बाजी मारली.

कोल्हापूरचा स्वरूप उन्हाळकरने सलग दुसर्यांदा खेलो इंडिया स्पर्धेत सुवर्णपदकाचा करिश्मा घडविला.पॅरीस ऑलिम्पिकपटू असणार्या स्वरूप हा स्पर्धेतील प्रमुख दावेदार होता. पुण्यातील बालेवाडी स्टेडियममधील कसून सरावामुळे पुन्हा यश हाती आले असे सांगून स्वरूप पुढे म्हणाले की, पॅरीसमधील अपयश मागे टाकून या पदकापासून नवी सुरूवात झाली आहे. आशियाई स्पर्धा आणि ऑलिम्पिक पदक हेच माझे स्वप्न आहे. नुकतीच दहावीची परीक्षा दिलेला सोलापूरच्या कविन केगनाळकरने रौप्यपदकाची लक्षवेधी कामगिरी केली. डावा पाय गुडघ्यापासून नसलेल्या कविनने कृत्रिम पायावर उभा राहत पदकाचा पराक्रम केला. गत स्पर्धेत त्याला पाचव्या स्थानावर समाधान मानावे लागले होते. खेलो इंडिया स्पर्धेसाठी खूप मेहनत केली होती. यामुळे यश लाभले असे कविनने सांगितले.

# नेत्यांचा वाद म्हणजे ना घर का, ना घाट का...

## १४ गावांचा विकास की राजकीय गोंधळ? शासनाने लक्ष न दिल्यास पुढच्या निवडणुकीत मोठा फटका बसणार

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२२, दहिसर (ठाणे) :** लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दिनांक ०७ मार्च २०२४ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मोठ्या गाजावाजात १४ गावांना नवी मुंबई महानगरपालिकेत समावेश करण्याचा शासकीय निर्णय जाहीर केला. ही घोषणा ग्रामस्थांसाठी मोठी आशादायी होती, कारण महानगरपालिकेचा भाग झाल्याने या गावांमध्ये पायाभूत सुविधा, आरोग्य सेवा, शिक्षण व्यवस्था आणि रोजगाराच्या संधी वाढतील, असे सांगण्यात आले. पण प्रत्यक्षात काय झाले? एक वर्ष उलटूनही या गावांच्या नशिबी विकास नाही, तर केवळ आश्वासनांची खैरात झाली आहे.

१४ गावांचा समावेश झाल्यापासून हे गाव विकासाऐवजी राजकीय लढाईचे रणांगण बनले आहे. गणेश नाईक आणि एकनाथ शिंदे यांच्यातील वादामुळे या गावांचे राजकीय आखाड्यात रूपांतर झाले आहे. निवडणुका आल्या की विकासाच्या नावाने झेंडे फडकवायचे, भाषणात मोठमोठ्या घोषणा करायच्या आणि सत्ता मिळाली की सामान्य जनतेला वाऱ्यावर सोडायचे – हीच वृत्ती लोकांना आता सहन होत नाही. या नेत्यांचा वाद म्हणजे ना घर का, ना घाट का अशी स्थिती निर्माण करणारा आहे. एका बाजूला शिंदे गटाच्या घोषणांचा पाऊस पडतो, तर दुसरीकडे नाईक गट आपली भूमिका बजावतो. पण हा वाद सामान्य जनतेच्या हिताचा आहे का?की केवळ सत्तेसाठी लढणाऱ्या राजकारण्यांचा वैयक्तिक स्वार्थ आहे ?










महानगरपालिकेत समावेश झाला म्हणजे काय गावं विकसित होतात का ? एक वर्षात किमान काही मूलभूत सुविधा तरी मिळायला हव्या होत्या. पण आजही या गावांमध्ये आरोग्य केंद्रे अपुरी आहेत, रस्ते खराब अवस्थेत आहेत, पाणीपुरवठा अनियमित आहे आणि स्वच्छतेची दयनीय अवस्था आहे. सरकारी फाइल्समध्ये विकासाची मोठी स्वप्न रंगवली जातात, पण वास्तवात हा विकास केवळ पेपरवरच आहे. नवी मुंबई महानगरपालिका आणि सरकार यांच्यातील समन्वयाचा अभाव या गावांना अधिकच वेठीस धरत आहे.

सत्ताधाऱ्यांना केवळ निवडणुकीपुरतेच या गावांची आठवण येते. विकासाच्या नावाने घोषणा केल्या जातात, पण त्या केवळ मतांसाठीच. ग्रामस्थांच्या समस्यांकडे कोणी लक्ष देत नाही. निधी मंजूर होतो, पण प्रत्यक्षात कामं होत नाहीत. अधिकारी फक्त फाईल पुढे ढकलण्याचे काम करतात. स्थानिक लोकप्रतिनिधी ही मूग गिळून गप्प बसले आहेत. प्रश्न हा आहे की, जर १४ गावांचा विकास करायचा होता, तर एक वर्षात का काहीच सुधारणा झाल्या नाहीत? सरकारी अधिकाऱ्यांनी आणि राजकीय नेत्यांनी ठरवले आहे की लोकांनी झोपडीत रहावे, अस्वच्छ पाणी प्यावे, खराब रस्त्यांवर अपघातांना सामोरे जावे आणि मूलभूत हक्कांसाठी झगडत राहावे.

सरकार आणि राजकीय पक्षांवर अवलंबून राहून या गावांचा विकास होणार नाही. स्थानिकांनी संघटित होऊन लढा उभारला पाहिजे. सततचा पाठपुरावा आणि संघर्षाशिवाय काहीही मिळणार नाही, हे आधीच स्पष्ट झाले आहे.

१४ गाव सर्वपक्षीय विकास समितीने तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार श्रीकांत शिंदे, मनसेचे माजी आमदार राजूदादा पाटील, विद्यमान राजेश मोरे, मंत्री रवींद्र चव्हाण, उबाठा गटाचे सुभाष भोईर यांच्याकडे १४ गावांचा विकास होण्यासाठी वेळोवेळी प्रयन्त केले.

मात्र अद्याप ही विकासाच्या दृष्टीने कामाला सुरुवात झाली नाही. कारण सरकारकडे इच्छाशक्तीच नाही. लोकांनी जर आवाज उठवला, आंदोलन केले आणि लोकप्रतिनिधींना धारेवर धरले, तरच हे गावं खऱ्या अर्थाने विकसित होतील. अन्यथा, पुढच्या निवडणुकीत हेच नेते पुन्हा मतांसाठी गयावया करतील आणि निवडून आल्यानंतर जनतेला पुन्हा वाऱ्यावर सोडतील.

राजकीय पक्षांनी आणि नेत्यांनी लोकांच्या सहनशीलतेचा अंत पाहू नये. लोक आता फसणार नाहीत. १४ गावांचा विकास हा केवळ कागदावर नव्हे, तर प्रत्यक्ष जमिनीवर दिसला पाहिजे. जर शासनाने यावर तातडीने लक्ष दिले नाही, तर याचा मोठा फटका पुढील निवडणुकीत बसू शकतो. ग्रामस्थांनी जागरूक राहून आपल्या हक्कांसाठी संघर्ष सुरू ठेवला पाहिजे. अन्यथा, राजकारणी फक्त भाषणात १४ गावांचा विकास करत राहतील आणि प्रत्यक्षात सामान्य जनता अंधारातच राहील.

## थकीत पाणी बिलाच्या दंडामध्ये ५० टक्के सूट

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२२, नवी मुंबई :** महानगरपालिका क्षेत्रातील पाणी देयके थकीत असलेल्या ग्राहकांकडील थकीत पाणी देयक वसुलीकरिता सर्व प्रकारच्या पाणी देयक ग्राहकांसाठी विलंब शुल्क व दंडात्मक रक्कमेवर ५०% सूट / सवलत देण्याबाबतची अभय योजना दि. २१ मार्च २०२५ ते दि. ३१ मार्च २०२५ या कालावधीकरीता लागू करण्यात येत असल्याचे महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी जाहीर केले आहे. त्यानुसार, नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील सर्व प्रकारचे थकीत पाणी देयक ग्राहक तसेच मोरबे धरण ते कळंबोली दरम्यान असलेल्या मुख्य जलवाहिनीवरील ग्रामपंचायतींकडे थकीत पाणी देयक ग्राहक यांना थकीत पाणी देयक रक्कमेवरील विलंब शुल्क व दंडात्मक रक्कमेवर ५० टक्के सूट / सवलत ही दि.२१ मार्च ते दि.३१ मार्च २०२५ या कालावधीपर्यंत देण्यात येत आहे. तरी, या अभय योजनेचा लाभ घेऊन नागरिकांनी आपले थकीत पाणी देयक दि.३१ मार्च २०२५ पर्यंत भरणा करण्याचे आवाहन नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत नागरिकांना करण्यात येत आहे.

## शिळफाटा, दिव्यातील अनधिकृत बांधकामावर करावाई करा - राजू पाटील



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२२, दिवा (ठाणे) :** डोंबिवली पाठोपाठ आता शिळफाटा आणि दिव्यातील अनधिकृत बांधकामावरून विषय आता पुढे आला आहे. कल्याण ग्रामीण विधानसभा क्षेत्रातील शिळफाटा परिसरात बेकायदा बांधकामांचा सुळसुळाट वाढला आहे. लकी कंपाऊंड दुर्घटनेला ११ वर्षे पूर्ण झाली असली तरी यानंतर देखील अनधिकृत बांधकामांना आळा बसलेला नाही. मुंबई उच्च न्यायालयात ठाणे महानगरपालिकेने शिळ भागात ५२ अनधिकृत इमारती असल्याची माहिती दिली आहे. याहून अधिक बेकायदा इमारतीचे काम सुरू असून त्याकडे ही ठाणे पालिकेने लक्ष द्यावे. अशी मागणी दक्ष नागरिक संघटनेचे शरद पाटील, वैशाली भोसले आणि संतोष भोईर यांनी पत्रकार परिषद घेत पालिका प्रशासनाकडे केली होती. यानंतर महापालिकेने एका अनधिकृत इमारती कारवाई केली.

मात्र इतर अनधिकृत बांधकाम करावाई कधी करणार असा आता उपस्थिती केला जात असून मनसे नेते आणि आमदार राजू पाटील यांनी प्रशासनावर झोड घेतली असून पालिकेने दिव्यातील आणि शिळफाटा परिसरातील अनधिकृत बांधकामावर कारवाई करावी.

दरम्यान महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते राजू पाटील यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले की, मी कित्येक बांधकामाबद्दल तक्रारी केल्या आहेत, आमच्या पदाधिकाऱ्यांनी केलेल्या आहेत. परंतु मनीष जोशी अधिकारी आहेना तिथला, तो सर्वात भ्रष्ट आहे. दिव्यातील लोक म्हणतात स्लॅब पाठी ३ लाख जातात. त्यात यांचा वाटा असतो. पालिकेने अनधिकृत बांधकामावर कारवाई करावी.

# युवकांचे आदर्श, गरजवंतांचा आधार : सुजित झावरे पाटील



कर्तृत्व, दातृत्व आणि नेतृत्व ज्यांच्या ठायी असते तो माणसांना ओळखत बसण्यापेक्षा प्रत्येक माणूस जपण्याला जास्त प्राधान्य देत असतो आणि अशाच माणसांना समाजातील प्रत्येक घटक स्वतः च्या आयुष्यात सर्वस्व म्हणून मानायला लागतो. अहमदनगर जिल्हा परिषद उपाध्यक्ष पदावर कार्यरत असल्यापासून ते आजपर्यंत सुजित झावरे पाटील माणसं जपणारे आणि माणसांना आधार देणारे एक राजकीय व्यक्तीमत्व आहेत. वडील कै.मा.आ.वसंतराव झावरे साहेब यांच्या समृद्ध राजकारणाचा वारसा मिळाला असला तरी प्रतिकूल आणि अनुकूल परिस्थितीत स्वत:च्या ध्येयासाठी लढण्याची धमक आणि अस्तित्व राखण्यासाठी कष्ट करण्याची, कार्यकर्ते फक्त जोडायचेच नाहीत, तर ते टिकवण्याची शिकवणही वडिलांकडूनच मिळाली असल्याचे त्यांनी दाखवून दिले आहे. जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी नेहमीच आग्रही असणाऱ्या सुजित पाटील यांना वाढदिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!

**किसी मक्सद के लिए खडे हो तो एक पेड की तरह गिरे भी तो बीज की तरह ताकि दुबारा उगकर उसी मक्सद के लिए जंग कर सके ..** काहीशा अशाच मानसिकतेत ज्यांचे समाजाप्रति कार्य सुरू पारनेर मतदारसंघाचे युवा नेते नगर दक्षिण सर्वात तरुणांमध्ये ज्याची लाडके पाटील म्हणून ज्यांची ख्याती आहे. आपली धडाकेबाज कर्तव्यतत्परता, कृतिशील आक्रमकता, निर्णय होईपर्यंत समस्यांचा केला जाणारा पाठपुरावा, नागरी समस्यांचे निराकरण करताना त्यासाठी उपलब्ध करून दिलेले पर्याय, अशा सर्वच पातळीवर केलेले कार्य वेगळे आणि दखलपात्र ठरावे.

**पाटील साहेब** यांना मी गेल्या १३ वर्षापासून तसं पाहतोय ते सर्व जाती धर्मातील लोकांना सोबत घेऊन त्याच बरोबर एका संवेदनशील आणि सामाजिक भान असणारे कृतिशील राजकीय नेत्याची आहे, याकडे दुर्लक्ष करता येणार नाही. अगदी कमी वयात यांनी आपले सामाजिक भान दाखवतानाच उद्याच्या नेतृत्वाची चुणूक दाखविली आहे. वडील वसंतदादा यांच्या समृद्ध राजकारणाचा वारसा मिळाला असला तरी प्रतिकूल आणि अनुकूल परिस्थितीत स्वत:च्या ध्येयासाठी लढण्याची धमक आणि अस्तित्व राखण्यासाठी कष्ट करण्याची, मित्र व कार्यकर्ते फक्त जोडायचेच नाहीत तर ते टिकवण्याची शिकवणही वडिलांकडूनच मिळाली असल्याचे दाखवून दिले आहे.

समाजमाध्यमांमध्ये **पाटील साहेब** सर्वात अधिक सक्रिय असणारे युवानेते आहेत. त्यांच्या एका हाकेला हजारोंच्या संख्येने युवकांचा प्रतिसाद असतो, तर संपूर्ण पारनेर नगर तालुक्याच्या जनतेने, खासकरून युवावर्गाने जणू शिक्कामोर्तब केल्याचे स्पष्ट होत आहे. या यशामागे सुजित पाटील यांनी वडिलांच्या पावलावर पाऊल टाकत केलेल्या अपार मेहनतीचा आणि एकसंध ठेवलेल्या कार्यकर्त्यांच्या फळीचा वाटा आहे. पिता -पुत्रांनी नेहमीच कार्यकर्त्यांना बळ दिले आहे. कार्यकर्त्यांमधील गुण अचूक हेरून त्यांना संधी देण्याचे काम साहेबांनी नेहमीच केले. आज चा दिवस खूप खास आहे. आज आपल्या सुजित पाटील यांचा वाढदिवस ज्यांना आपण सर्वजण प्रेमाने पाटील म्हणतो असा नवीन उमदं कर्तृत्वान तरुण तडफदार नेतृत्व अतिशय मनमिळाऊ आणि रुबाबदार स्वभावाने प्रेमळ आणि सर्वांचे आवडते सुजित पाटील आपल्या महाविद्यलयीन जीवना पासून सर्व तरुणांनचे आवडते तुम नाही हम्म या तत्त्वावर सर्वांना एक जुटीने सोबत घेऊन चालणारे त्याना त्याच्या कार्यामुळेच सर्वांनी पाटील ही पदवी आपोआप बहाल केली आपल्या स्वभावाने आणि कार्याने त्यांनी हजरो युवक आणि पदवीधर शिक्षकांच्या मनावर राज्य केला आपल्या संघर्षाच्या बळावर वडिलांच्या पायावर पाऊल ठेवत त्यांनी हजारो न चा जनसपंर्क जोडलं देवकृपा फाऊंडेशनची स्थापना करून सर्व युवकांना एकत्र करत आपल्या सामाजिक कार्याची सुरुवात केली आज पारनेर नगर तालुक्यातील जनतेचे अनेक प्रश्न सोडवत आहेत सर्वांच्या मदतीला धावत अहोरात्र पारनेरकरांच्या सर्वसामान्य जनतेच्या सेवेसाठी त्यांनी स्वतः ला झोकून दिलाय असे दिलदार व्यक्तिमत्व त्यांनी महाविद्यलयीन जीवनात महाविद्यलयीन स्तरावर विद्यार्थ्यंचे नेतृत्व करताना त्यांनी अनेक विद्यार्त्याचे प्रश्न सोडवले तसें ते युवकांचे लाडके पाटील बनले. एवढ्या वरच ना थांबता ते असेच सर्वांना सोबत घेऊन चालत राहिले त्याच शैक्षणिक, सहकार आणि सामाजिक क्षेत्रात पण खूप योदान दिल आणि अजून पण त्याच कार्य सुरु च आहे सहकार आणि सामाजिक बांधीलकी जपत आज ते समाज सेवेत स्वतः ला वाहून घेऊन सर्वमान्यसाठी तण मन लावून ते काम करत आहेत त्याच प्रत्येक खूप काळजी पूर्वक मनापासून करत असतात निवडणुका असो अथवा सामाजिक उपक्रम पाटील यांनी परफेक्ट मॅनेजमेंटचा पाठ दाखवून दिला आहे. टाकलेला प्रत्येक डाव अचूक परिणाम साधणारा ठरला, ते राजकारणात खणखणीत नाणे ठरले आहेत यांनी आजवर केलेल्या अनेक सामाजिक कामांची नोंद गोर गरीब जाणते चे प्रश्न सोडवत अनेक सामाजिक उपक्रम राबवत आहेत.

अगदी कमी वयात पाटील साहेबांनी यांनी आपले सामाजिक भान दाखवतानाच उद्याच्या नेतृत्वाची चुणूक दाखविली. पाटील साहेबांचा आजवरचा वादळी प्रवास यांचा राजकीयपी झंझावात, अचूक निर्णय क्षमता आणि त्यांच्या एका हाकेस हजारो शी युवकांची फळी त्यांच्या पाठीशी जमा होणारे, जीवाला जीव देणारे कार्यकर्त्यांचे मोहोळ पाहता पाटील साहेब राज्यातील नव्या राजकीय समीकरणातील आश्वासक तरुण चेहरा ठरतील.

अशा युवा नेत्याचा आज वाढदिवस **वाढदिवस एका...... वादळाचा, वाढदिवस एका..... धगधगत्या निखाऱ्यांचा, वाढदिवस एका..... असामान्य नेत्याचा, वाढदिवस एका.....सच्चा मित्राचा, वाढदिवस एका..... पारनेर मधील युवकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्यांचा, वाढदिवस एका..... विशाल अथांग सागराचा, वाढदिवस एका....** पारनेरच्या वाघाचा, पाटील साहेब यांना त्यांच्या पुढील कार्यास खूप खूप शुभेच्छा आणि यांना दीर्घायुष्य लाभावे ही श्री चरणी सदिच्छा शब्दांकन – युवा उद्योजक, कैलास नऱ्हे पाटील

**संकलन – वसंत रांधवण**
**दैनिक अक्षराज, अहमदनगर जिल्हा प्रतिनिधी**

# ॲथलेटिक्समध्ये ट्रिपल धमाका

## भाग्यश्री, प्रणव, अक्कुताई यांना सुवर्ण; ऋतुजा कवठाळेला रौप्य पदक

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२२, नवी दिल्ली :** खेलो इंडिया पॅरा गेम्समध्ये ॲथलेटिक्स प्रकारात महाराष्ट्राच्या खेळाडूंनी शानदार कामगिरी कायम राखत पदकांची लयलूट सुरूच ठेवली आहे. भालाफेकमध्ये पॅराऑलिम्पियन भाग्यश्री जाधव, पुरुषांच्या १०० मीटर धावण्याच्या शर्यतीत प्रणव देसाई आणि महिलांच्या थाळीफेक प्रकारात अक्कुताई उलभगत यांनी सुवर्णपदक पटकावले. लांब उडी प्रकारात ऋतुजा कवठाळेने रौप्यपदक मिळवले.



जवाहरलाल नेहरू स्टेडियममध्ये सुरू असलेल्या दुसर्या पर्वातील खेलो इंडिया पॅरा स्पर्धेत सलग दुसरा दिवस महाराष्ट्रासाठी सुवर्णदिन ठरला. पुण्यातील शिवाजीनगर येथील पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर सराव करणार्या ३७ वर्षीय भाग्यश्रीने गोळाफेकमध्ये अपेक्षेनुसार सुवर्ण जिंकले. तिने १३.५७ मीटर अंतरावर गोळा फेकला.

दुसरे स्थान मिळवणार्या दीपिकाराणीने १०.४२ मीटरची कामगिरी नोंदवली. यावरून भाग्यश्रीचे वर्चस्व लक्षात येईल. ती रवींदर यांच्या मार्गदर्शना खाली सराव करते. भाग्यश्री रविवारी (दि.२४) गोळाफेक प्रकारात ही सहभागी होत आहे. यातही तिच्याकडून सुवर्णपदकाची अपेक्षा आहे. गतस्पर्धेत या दोन्ही प्रकारात भाग्यश्रीने दुहेरी सुवर्णपदकांचा पराक्रम केला होता.




ठाण्याच्या प्रणव देसाईने १०० मीटर धावण्याच्या शर्यतीत प्रतिस्पर्ध्यांना बरेच मागे टाकून वेगवान पुरुषाचा मान मिळवला. त्याने ही शर्यत ११.८८ सेकंदात जिंकली.१२.५१ सेकंद वेळ देत हिमाचल प्रदेशचा राजवीरसिंग दुसरा तर १२.६५ सेकंद वेळेसह तमिळनाडूचा राजेशकुमार तिसरा आला. पायाला जन्मजात वैगुण्य असलेला प्रणव सध्या बंगळुरू येथे साईच्या केंद्रात आर. सुरेशकुमार यांच्या मार्गदर्शना खाली सराव करीत आहे.या वर्षी नवी दिल्लीत होणारी वर्ल्ड चॅम्पियनशिप तसेच पुढील वर्षी होणार्या एशियन पॅरा गेम्सची तयारी सध्या सुरू असून या दोन्ही स्पर्धांमध्ये देशासाठी पदक जिंकायचे असल्याचे प्रणवने सांगितले.



महिलांच्या थाळीफेक प्रकारात सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातील मुलगी असलेल्या ३८ वर्षीय अक्कूताईने महाराष्ट्राला सुवर्णपदक जिंकून दिले. तिने १५.८३ मीटर अंतरावर थाळीफेक केली. रौप्यपदक मिळवणार्या छत्तीसगडच्या छोटी मेहराने १३.२२ मीटर इतकी थाळी फेकली.

अमरावतीच्या २५ वर्षीय भाग्यश्री कवठाळे हिने लांब उडी प्रकारात ३.८४ मीटर कामगिरी नोंदवत रौप्यपदक जिंकले. पूर्वीच्या दुखापतीतून ती अद्याप पूर्णपणे सावरली नसल्याने डॉक्टरांनी तिला जास्त सराव न करण्याची ताकीद दिली होती. यामुळे योग्य सरावाअभावी तिला कामगिरी उंचावता आली नाही.

# नागपूर लोकसभा मतदारसंघातील निवडणूक याचिका फेटाळली; गडकरींना दिलासा

**अक्षराज : चंदन सिंह**

**दि.२१, मुंबई :** मुंबई उच्च न्यायालयाने केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्या नागपूर लोकसभा मतदारसंघातील निवडीला आव्हान देणारी याचिका फेटाळली आहे. गडकरी यांनी निवडणुकीत गैरप्रकार केल्याचा आरोप करणाऱ्या याचिकाकर्ता सुरज मिश्रा यांच्या याचिकेत आवश्यक 'मूलभूत तथ्ये' नसल्याचा निष्कर्ष न्या. उर्मिला जोशी-फळके यांच्या एकलपीठाने दिला.



सुरज मिश्रा (३०) यांनी दाखल केलेल्या याचिकेत असा आरोप करण्यात आला होता की, गडकरी आणि त्यांच्या पक्षाच्या कार्यकर्त्यांनी मतदारांना त्यांचे छायाचित्र व भाजपचा चिन्ह असलेल्या मतदाता चिठ्ठ्या वाटल्या. तसेच, भाजप कार्यकर्त्यांकडे खास सॉफ्टवेअर असलेले मशीन होते, ज्याद्वारे मतदारांची संपूर्ण माहिती मिळत होती आणि ती छापील स्वरूपात दिली जात होती.

न्यायालयाने या आरोपांवर विचार करताना नमूद केले की, याचिकेत कुठेही हे स्पष्ट करण्यात आलेले नाही की या कथित गैरप्रकारांमुळे निवडणुकीच्या निकालावर काय परिणाम झाला. त्यामुळे, 'प्रतीकूल परिणाम' सिद्ध करणारी आवश्यक तथ्ये याचिकेत नसल्याचे न्यायालयाने सांगितले. न्यायालयाने स्पष्ट केले की, भ्रष्ट आचारसंहितेच्या आरोपांसाठी Representation of People Act, १९५१ च्या कलम ८३(१)(र) अन्वये निवडणूक निकालावर प्रत्यक्ष परिणाम झाला हे स्पष्ट करणे आवश्यक आहे. तथापि, याचिकाकर्त्याने हे सिद्ध करणारी कोणतीही ठोस माहिती सादर केली नाही. तसेच, कलम १२३(५) अंतर्गत भ्रष्ट आचारसंहितेचा गुन्हा ठरवण्यासाठी, संबंधित मशीन कोणी आणली, कोणाच्या संमतीने वापरण्यात आली आणि मतदारांवर याचा कसा प्रभाव पडला हे स्पष्ट करणे आवश्यक आहे. परंतु, याचिकेत याचा उल्लेख नव्हता. त्यामुळे, निवडणुकीच्या निकालावर परिणाम झाल्याचे स्पष्ट न करता, केवळ आरोप केले गेले आहेत. त्यामुळे ही याचिका अपूर्ण कारणावर आधारित असल्याचे सिद्ध होते, असे न्यायालयाने नमूद केले.

न्यायालयाने याचिका फेटाळत याचिकाकर्ता सुरज मिश्रा यांना नितीन गडकरी यांचा न्यायालयीन खर्च भरून देण्याचा आदेश दिला. कलम ११९ आणि १२१ अन्वये निवडणूक याचिका लढवण्यासाठी झालेल्या खर्चाची भरपाई गडकरी यांना मिळावी, असे न्यायालयाने ठरवले.

# रांधे येथे दि.२७ पासून भव्य अखंड श्री स्वामी कथेचे आयोजन

**अक्षराज; राजकुमार इकडे**

**दि.२२, सुपा (अहिल्यानगर) :** श्री स्वामी समर्थ प्रकट दिन आणि प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्ताने रांधे येथील माळवाडी मध्ये श्री क्षेत्र पैठण येथील प्रसिद्ध ज्ञानमार्तंड हभप नारायण महाराज काळे यांच्या सुश्राव्य वाणीतून गुरुवार, दि.२७ ते सोमवार, दि.३१ रोजी अखंड श्री स्वामी समर्थ महाराजांच्या कथेचे प्रवचन आयोजीत करण्यात आले असल्याची माहिती श्री स्वामी समर्थ देवस्थान ट्रस्टचे संस्थापक अनिलराव आवारी यांनी दिली.



**पारनेर तालुक्याच्या इतिहासात प्रथमच श्री स्वामी समर्थ महाराजांच्या कथेचे प्रवचन आयोजीत करण्यात आले आहे. यातून श्री स्वामी समर्थ महाराजांचे जीवन चरित्र प्रवचनाच्या माध्यमातून उलगडून सांगण्यात येणार असून त्यातून श्री स्वामी समर्थ महाराजांची महती कळणार आहे.**

गुरुवार, दि.२७ ते सोमवार, दि.३१ पर्यंत दररोज सायंकाळी ७.३० ते ९.३० वाजेपर्यंत जन कल्याण व विश्वशांती साठी रांधे येथील माळवाडी च्या श्री स्वामी समर्थ देवस्थान च्या विद्यमाने थोर संत श्रेष्ठ एकनाथ महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या श्री क्षेत्र पैठण येथील ज्ञानमार्तंड हभप नारायण महाराज काळे यांच्या सुश्राव्य वाणीतून श्री स्वामी समर्थ महाराजांच्या कथेची प्रवचन सेवा आयोजीत करण्यात आली असून गुरुवार, दि.२७ ते शनिवार, दि.२९ पर्यंत बाभुळवाडे चे श्री केदारेश्वर प्रासादिक भजनी मंडळ, रांधे चे श्री विठ्ठल प्रासादिक भजनी मंडळ, दरोडी चे हनुमान प्रासादिक भजनी मंडळ यांचा सुश्राव्य भजनाचा कार्यक्रम होणार आहे. तर रविवार, दि.३० रोजी वडझिरे येथील विठ्ठल रुक्मिणी पायी दिंडी सोहळा आयोजीत करण्यात आला असून गजानन , हनुमान, श्रीराम, भैरवनाथ, संगमेश्वर, सिध्देश्वर, विठ्ठल, चोंभेश्वर, खोडदेबाबा, रेणुकामाता प्रासादिक भजनी मंडळांचा भजन सेवेचा कार्यक्रम संपन्न होणार आहे. अखेरच्या टप्प्यात सोमवार, दि.३१ रोजी सकाळी ७.३० ते दुपारी १२.३० वाजता यज्ञ व प्राणप्रतिष्ठा विधी व सायंकाळी ५ ते रात्री ८.१५ वाजता रांधे येथील ग्रामदैवत रांधुआई, प्रति पंढरपूर असलेले विठ्ठल रुक्मिणी, चारंग बाबा, भैरवनाथ, हनुमान महाराज, श्री गुरुदेव दत्त, श्री खंडोबा या देवांच्या व श्री स्वामी समर्थ महाराजांच्या भेटी व भव्य पालखी मिरवणूक आणि वितरण सोहळा आयोजीत करण्यात आला आहे.

रात्री ९.३० ते ११ वाजेपर्यंत थोर उदार व दानशूर अन्नदाते यांच्या लोकसहभागातून अन्नदान महाप्रसाद करण्यात येणार असून रात्रीच्या वेळी फटाक्यांची आतिषबाजी आयोजीत करण्यात येणार आहे. तर भव्य सोडत योजनेव्दारे ई बाईक, फ्रिज, एल. ई.डी.टि.व्ही, वॉटर फिल्टर हे बक्षीसे भाग्यवान भाविक भक्तांना देण्यात येणार आहे. तरी धर्मानुरागी परमार्थ प्रेमी श्री स्वामी समर्थ महाराजांच्या आबालवृद्ध महिला व पुरुषांनी भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने व श्रद्धेने या अखंड श्री स्वामी समर्थ महाराजांची कथा प्रवचन श्रवण करण्यासाठी व तद्नंतर च्या महाप्रसादाचा लाभ घ्यावा. असे आवाहन ही श्री स्वामी समर्थ देवस्थान च्या वतीने करण्यात आले आहे.

# आंतरराज्य गुन्हेगार अजय कटवाल उर्फ नेपाळी धुळे पोलिसांच्या ताब्यात

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२१, धुळे :** विविध स्वरूपाचे गुन्हे दाखल असलेला आंतरराज्य टोळीतील गुन्हेगार अजय कटवाल उर्फ नेपाळी यास स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाने अटक केली. पोलिसांनी नेपाळीकडून तीन लाख रुपयांची मोटार जप्त केली. अजय कटवाल उर्फ नेपाळी (रा. पुरुषोत्तम कॉलनी, नगावबारी, देवपूर, धुळे) हा शहरातील गणपती मंदिराजवळील पांझरा नदीकिनारी चारचाकी वाहनासह उभा असल्याची माहिती स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे निरीक्षक श्रीराम पवार यांना मिळाली.

पथकाने नेपाळी यास मोटारीसह ताब्यात घेतले. त्याच्याकडे वाहनाची कागदपत्रे मागितली असता त्याने त्याचा साथीदार आर्यन खान (रा. राणीगंज, जि. प्रतापगड, उत्तर प्रदेश) याच्यासह काही दिवसांपूर्वी संगमनेर शहरातून रात्रीच्या वेळी चोरी केल्याची कबुली दिली. याबाबत पोलिसांनी माहिती घेतली असता मोटार चोरीबाबत संगमनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असल्याचे समजले. पोलिसांनी नेपाळीकडून मोटारही जप्त केली आहे. नेपाळीविरुध्द मोहाडीनगर, दोंडाईचा, चिपळूण (जि. रत्नागिरी), विश्रामबाग (सांगली), रामनगर, वर्धा, गाडगेनगर (अमरावती), नांदगाव, पेठ, अमरावती, अंबरनाथ, उल्हासनगर या पोलीस ठाण्यात तसेच मध्य प्रदेशातील विविध ठिकाणी गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलीस तपासात उघड झाली.

# थोडक्यात

## असोली ग्रामपंचायत कार्यालय येथे ग्राम कृषी विकास रचना समिती निवड

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२१, माहूर :** दिनांक २१/०३/२०२५ रोजी ग्रामपंचायत कार्यालय असोली येथे ग्रामसभा दरम्यान बैठक आयोजित करण्यात आलेले असून त्या बैठकीत ग्राम कृषी विकास रचनेचे स्थापन करण्यात आले. ग्राम कृषी विकास रचनेचे अध्यक्ष म्हणून ग्रामपंचायत कार्यालयाचे प्रसिद्धी अध्यक्ष सरपंच यमुनाबाई गाणीराम राठोड व तसेच प्रसिद्धी सदस्य म्हणून ग्रामपंचायत उपसरपंच वंदनाबाई मदन जाधव व ग्रामपंचायत सदस्य दादाराव किसन चव्हाण, अशोक उकंडराव मुनेश्वर व तसेच गावातील प्रगतीशील शेतकरी म्हणून निवड झालेले. महेंद्र विठ्ठल पुरी वउल्हास दत्ता राठोड प्रगतिशील महिला शेतकरी म्हणून निवड झालेले. सीमा मदन ठाकूर विविध कार्यकारी सहकारी संस्थेचे अध्यक्ष म्हणून निवड झालेले. राजेश नंदकिशोर गिरी व तसेच शेतकरी उत्पादक म्हणून निवड झालेले. हरिचंद सोमला राठोड व तसेच महिला बचत गट प्रतिनिधी म्हणून निवड झालेले महिला ज्योती महिंद्र पुरी व तसेच कृषी पूरक व्यवसाय शेतकरी महिला म्हणून निवड झालेले. दुर्गाबाई संतोष गिरी व मंगलाबाई राजू मरापे व तसेच ग्राम महसूल अधिकारी. आर. ऐ. ठाकरे व कृषी सहाय्यक व्ही.पी. गुहाडे व गावातील युवक सावन भाऊ चव्हाण मित्र मंडळ तसेच गावातील संपूर्ण मंडळी उपस्थित होती.



## राजकर्त्यांच्या नाकर्तेपणामुळे रोजगार सहाय्यकावर उपासमरीची वेळ

**अक्षराज : जयराम देमगुंडे**

**दि.२२, उदगीर (लातूर) :** उदगीर गेल्या पाच महिन्यांपासून मानधन न मिळाल्याने रोजगार सहायक उपासमारीच्या परिस्थितीत आले आहे. कुटुंबांच्या उदरनिर्वाह कसा करावा. हा प्रश्न निर्माण झाला आहे. शासनाने तातडीने ग्राम रोजगार सहायकाचे मानधन द्यावे ही मागणी जोर धरत आहे. कामावर आधारित अनिश्चित मानधनावर काम करणाऱ्या ग्राम रोजगार सहायकांना आठ हजार रुपये मानधन देण्याची घोषणा शासनाकडून करण्यात आली. त्याबाबतचा शासन निर्णय ३ ऑक्टोबर २०२४ रोजी काढण्यात आला. मात्र आजअखेर ग्राम रोजगार सहायकांना मानधनच मिळाले नाही..




महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची जबाबदारी गावपातळीवर सरपंच आणि ग्रामसेवकांवर देण्यात आली आहे. या कामात ग्रामपंचायत स्तरावर अभिलेख आणि नोंदवह्या ठेवण्यासाठी मदत करण्याची आणि प्रत्यक्ष काम करण्यासाठी ग्रामरोजगार सहायकांची अर्धवेळ स्वरूपात नियुक्ती करण्यात आली होती. यापूर्वी ग्राम रोजगार सहायकांना गावात झालेल्या अकुशल कामावर मनुष्य दिवसांच्या मजुरी खर्चावर आधारित मानधन देण्यात येत होते. ज्या गावात जास्त काम होत होते, त्या गावातील ग्राम रोजगार सहायकांना चांगले मानधन मिळत होते.

मात्र, ज्या गावात कमी काम होत होते. जागील शासनाच्या काळात ग्राम त्या गावातील ग्राम रोजगार सहायकांना तुटपुंजे मानधन मिळत होते. त्यामुळे रोजगार सहायकांना महिन्याला आठ हजार रुपये निश्चित मानधन देण्याचा निर्णय घेण्यात आला. याबाबतचा शासन निर्णय ३ आक्टोबर २०२४ रोजी काढण्यात आला. राज्यात तब्बल २७ हजार ग्राम रोजगार सहायक कार्यरत आहेत. या निर्णयामुळे ग्राम रोजगार सहायकांना दिलासा मिळाला होता. मात्र, पाच महिन्यांपासून मानधनच मिळाले नाही. केलेल्या कामाचा पाच महिन्यांपासून मोबदलाच मिळत नसल्यामुळे ग्रामरोजगार सह्यायकांची फरपट सुरू आहे. शासनाने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करून प्रलंबित मानधनासह नियमित मानधन तात्काळ द्यावे, अशी मागणी ग्राम रोजगार सेवकांतून होत आहे.

विधानसभा निवडणुकीपूर्वी गाव पातळीवर मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजनेंतर्गत मानधन तत्त्वावर कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली. या कर्मचाऱ्यांना दहा हजार मानधन देण्यात आले. वैयक्तिक लाभाच्या योजना पुरवणाऱ्या ग्रामरोजगार सहायकांना काम करूनही हक्काच्या मानधनापासून वंचित ठेवून बेदखल करण्यात आले आहे.

## अंत्यविधीला पैसे नसल्याने मुलीचे पार्थिव सोडून आई पसार

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२१, बीड :** अंत्यविधीसाठी पैसे नसल्याने मुलीचे पार्थिव रुग्णालयातच सोडून आई पसार झाल्याचा प्रकार बीडमध्ये शुक्रवारी घडला. अखेर शनिवारी दुपारी स्थानिक सामाजिक कार्यकर्त्यांच्या पुढाकारातून मृत मुलीवर अंत्यसंस्कार करण्यात आले.पूजा (वय ७), असे मृत मुलीचे तर सोनाली हे आईचे नाव असल्याचे अमजदखान यांनी सांगितले. खान आणि परशुराम गुरखुदे यांनी मृत मुलीच्या अंत्यसंस्काराची जबाबदारी स्वीकारून शनिवारी सर्व सोपस्कार पार पाडले. यावेळी मृत मुलीच्या दोन्ही मावशा, त्यांचे पती व इतर दोन नातेवाईक हजर होते, असे अमजदखान यांनी सांगितले. मृत पूजाला लहानपणापासूनच मिरगी (फिट्स) येण्याचा आजार होता. रस्त्यावर खेळ मांडून उपजीविका करणाऱ्या समाजातील सोनालीची परिस्थिती दोनवेळचे जेवण मिळण्यासारखीही नाही. गुरुवारी रात्री पूजा झोपली ते सकाळी उठलीच नाही. ती उठेना म्हणून सोनाली पूजाला घेऊन जिल्हा रुग्णालयात आली. तेथे डॉक्टरांनी पूजाला मृत घोषित केले. पूजाला मृतावस्थेत आणल्यामुळे शवविच्छेदन करावे लागणार होते. तेव्हा शवविच्छेदन विभागाजवळील एका पोलिसाजवळ बोलताना सोनाली म्हणाली, साहेब आपल्याजवळ चहा प्यायला छदाम नाही तर पोरीची मूठमाती करायला कुठून पैसा आणू. ही माहिती पूजावर अंत्यसंस्कार करणारे अमजदखान यांनी दिली.

पूजाच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्याची जबाबदारी आपण व आपले सहकारी परशुराम गुरखुदे यांनी उचलली. अंत्यसंस्कारावेळी पूजाची आई नव्हती, पण इतर मोजकेच नातेवाईक होते. पोलिसांनी त्यांचा शोध घेतला होता. त्या नातेवाईकांकडेही उत्तर विधीसाठी पैसे नव्हते. उलट त्यांनाच परत जाण्यासाठी पैसे द्यावे लागले. **– अमजदखान.**